पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
( स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव )
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID : sp.jalgaon@mahapolice.gov.in
pilcb.jalgaon@gmail.com

प्रति, -: प्रेस नोट :- दिनांक १६/०३/२०२६

मा.संपादक,
सर्व..................,

**विषय : अमळनेर येथील ५ लाख २७ हजारांच्या लूटमारीचा पर्दाफाश, धुळ्यातील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार गजाआड! जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची (LCB) धडक कारवाई.**

**जळगाव :** भरदिवसा व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरची पूड फेकून ५ लाख २७ हजार रुपयांची रोख रक्कम लुटणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा छडा लावण्यात जळगाव पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेला (LCB) मोठे यश आले आहे. याप्रकरणी एल.सी.बी. च्या पथकाने धुळे येथील एका रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगाराला शिताफीने अटक केली असून, त्याच्या इतर दोन साथीदारांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.

## नेमकी घटना काय?

दिनांक २५/०२/२०२६ रोजी सकाळी १०.५५ वाजेच्या सुमारास अमळनेर येथील 'लामा जिनिंग'चे मालक यतिन विनोद कोठारी (वय ४८) हे त्यांच्या ॲक्टिवा दुचाकीवरून (MH-19-BC-1465) ५,२७,२००/- रुपयांची रोख रक्कम आणि जेवणाचा डबा एका ग्रे रंगाच्या रेक्झीन बॅगमध्ये घेऊन जिनिंगकडे जात होते. पिंपळे रोडवर एका मोटारसायकलवरून आलेल्या तीन अज्ञात इसमांनी त्यांना अडवून त्यांचा चष्मा बळजबरीने ओढून काढला. त्यानंतर त्यांच्या तोंडावर मिरची पावडर फेकून पायाजवळ ठेवलेली ५ लाख २७ हजार रुपये रोख रकमेची बॅग बळजबरीने हिसकावून पोबारा केला होता. या गंभीर घटनेप्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ००६७/२०२६ भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३०९(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## तपासाचे आव्हान आणि एल.सी.बी. ची धडक कारवाई:

मा. पोलीस अधीक्षक सो. श्री. महेश्वर रेड्डी यांनी या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून समांतर तपास करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला (LCB) दिले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. जितेंद्र वल्टे आणि त्यांच्या पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण (Technical Analysis) व गुप्त बातमीदारांमार्फत माहिती काढली निष्पन्न झाले की, सदरचा गुन्हा धुळे येथील सराईत गुन्हेगार मनोज ऊर्फ खुशाल अशोक मोकळ याने त्याच्या साथीदारांसह केला आहे. एल.सी.बी. च्या पथकाने सापळा रचुन आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली आहे. सदर आरोपीकडुन गुन्ह्यातील रकमेपैकी दीड लाख रुपयांची रिकव्हरी करण्यात आली आहे.

## अटक आरोपी आणि त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी :

- मनोज खुशाल ऊर्फ अशोक मोकळ, (वय- २६ वर्षे, रा. दंडेवाला नगर, मोहाडी, जि. धुळे).
- अटक करण्यात आलेला आरोपी मनोज मोकळ हा सराईत आणि रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. यापूर्वी मार्च २०२१ मध्ये त्याने जळगाव शहरातील पंचमुखी हनुमान मंदिर परिसरात पिस्तुलाचा धाक दाखवून इतर दोन साथीदारांसह तब्बल १५ लाख रुपये रकमेची बॅग लिफ्टिंग केली होती. त्यावेळेस देखील जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकानेच त्याला अटक केली होती.

## पुढील तपास :

सदर गुन्ह्याचा पुढील तपास अमळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. शरद काकळीज हे करीत आहेत. फरार असलेल्या इतर दोन आरोपींचा कसून शोध घेतला जात आहे.

## विशेष कामगिरी करणारे पथक (LCB) :

**सदरची यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती कविता नेरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विनायक कोते यांच्या मार्गदर्शनाखाली:**

- **श्री. राहुल गायकवाड (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव)**
- **पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र वल्टे.**
- **पोह.२७०७ संदिप रमेश पाटील, पोह.०२ हरिलाल लक्ष्मण पाटील, पोह.२३०६ प्रविण जनार्दन मांडोळे, पोकॉ.१३८२ राहुल नथु कोळी, चापोहेकॉ २६९१ दिपक ज्ञानदेव चौधरी यांनी केली आहे. तसेच तांत्रिक विश्लेषण कामी पोकॉ २३०५ गौरव भगवान पाटील व पोकॉ १९७८ मिलींद सिताराम जाधव यांनी विशेष सहकार्य केले.**

**प्रसिद्धीसाठी सादर,**

*(जनसंपर्क अधिकारी)*
**जळगाव पोलीस.**



vivo Y400 Pro 5G

26mm f/1.79 1/33s ISO722
03/15/2026, 03:10